पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत इंदापूर पोलीस स्टेशनचे विभाजन करुन नवीन निरा-नृसिंहपूर पोलीस स्टेशन निर्माण करण्यास व त्यानुषंगिक येणाऱ्या आवर्ती आणि अनावर्ती खर्चास मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः पीओएस-०८२१/प्र.क्र.४५/पोल-३
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १३ डिसेंबर, २०२१.

वाचा :-

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/निरा-नृसिंहपूर-पुणे ग्रा/२७२/२०१८, दि.१५.०६.२०२१.

२) उच्च स्तरीय सचिव समितीच्या दि.०५/१०/२०२१ रोजी पार पडलेल्या सन २०२१ मधील ७ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

प्रस्तावना :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील दिनांक १५.०६.२०२१ रोजीचे पत्रान्वये पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत इंदापूर स्टेशनचे विभाजन करुन नवीन निरा-नृसिंहपूर पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुषंगाने उक्त संदर्भ क्र.२ येथील दि.०५/१०/२०२१ रोजी उच्च स्तरीय सचिव समितीच्या पार पडलेल्या सन २०२१ मधील ७ व्या बैठकीतील कार्यवृत्तानुसार समितीने दिलेली मान्यता विचारात घेवून, शासनाने याप्रकरणी खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णयः-

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत इंदापूर स्टेशनचे विभाजन करुन नवीन निरा-नृसिंहपूर पोलीस स्टेशन निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. नवनिर्मित निरा-नृसिंहपूर पोलीस ठाण्याकरिता सदर शासन निर्णयासोबतच्या "**परिशिष्ट-अ"** मध्ये नमूद केलेली विविध संवर्गातील नियमित एकुण ५५ पदे निर्माण करण्यास व याअनुषंगाने येणा-या रू.४,५९,९१,९३२ /-(अक्षरी रूपये चार कोटी एकोणसाठ लाख ऐक्यान्नव हजार नऊशे बत्तीस फक्त) इतक्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे. **तसेच, सदरच्या ५५ पदांपैकी पोलीस नाईक या संवर्गातील १५ पदांबाबत भविष्यात धोरणात्मक निर्णय घेतला गेल्यास, त्याप्रमाणे निर्णय लागू राहील.**

३. नवनिर्मित निरा-नृसिंहपूर पोलीस ठाण्याकरिता सदर शासन निर्णयासोबतच्या "**परिशिष्ट-ब"** मध्ये नमूद केल्याप्रमाणे रु.३५,४१,५००/-(अक्षरी रुपये पस्तीस लाख एक्केचाळीस हजार पाचशे फक्त) इतक्या अनावर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे

४. नवनिर्मित निरा-नृसिंहपूर पोलीस ठाण्याकरिता येणारा आवर्ती खर्च व अनावर्ती खर्च उपलब्ध मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. नवनिर्मित निरा-नृसिंहपूर पोलीस ठाण्याकरिता हद्दनिश्चितीबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालकांनी शासनास तात्काळ सादर करावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ६९८/२०२१,दि.२८/१०/२०२१ व्दारे वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२११२१४१७३००७५२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

GAIKWAD KAILAS ARJUN

Digitally signed by GAIKWAD KAILAS ARJUN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, pseudonym=98E519306D20397D354BD181099105F0AC1EFDEC, serialNumber=47D160717AE29C2D2661B5275D8B9B4CFAE93893BE65A2785314SA4C04D865CD, cn=GAIKWAD KAILAS ARJUN
Date: 2021.12.14 17:31:16 +05'30'

(कैलास गायकवाड)
सह सचिव, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.मंत्री,गृह यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री,गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
५. मा.राज्यमंत्री,गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
६. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर.
११.जिल्हाधिकारी, पुणे.

१२.पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.
१३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१५.सह सचिव(पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई
१६.निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
१७.वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
१८. निवड नस्ती, पोल-३.

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पीओएस-०८२१/प्र.क्र.४५/पोल-३,

दिनांक: १३ डिसेंबर, २०२१ चे सहपत्र.

“परिशिष्ठ-अ”

नवनिर्मित निरा-नृसिंहपूर पोलीस ठाण्याकरिता आवश्यक नव्याने निर्माण करण्यात येणा-या पदांचा तपशिल

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदसंख्या
.१	पोलीस निरीक्षक	S-१८-(रू.४९१०० ते रू.१५५८००)	०१
.२	सहायक पोलीस निरीक्षक	S-१५-(रू.४१८०० ते रू.१३२३००)	०२
.३	पोलीस उपनिरीक्षक	S-१४-(रू.३८६०० ते रू.१२२८००)	०२
.४	सहायक पोलीस उपनिरीक्षक	S-१०-(रू.२९२०० ते रू.९२३००)	०५
.५	पोलीस हवालदार	S-९-(रू.२६४०० ते रू.८३६००) SPL. ७५०/-	१०
.६	पोलीस नाईक	S-८-(रू.२५५०० ते रू.८११००)	१५
.७	पोलीस शिपाई	S-७-(रू.२१७०० ते रू.६९१००) SPL. ७५०/-	२०
	एकुण पदे -		**५५**

****

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पीओएस-०८२१/प्र.क्र.४५/पोल-३,
दिनांक: १३ डिसेंबर, २०२१ चे सहपत्र.

"परिशिष्ट-ब"

नवनिर्मित निरा-नृसिंहपूर पोलीस ठाण्याकरिता येणारा अनावर्ती खर्चाचा तपशील

अ.क्र.	तपशील	संख्या	रक्कम रुपये
१.	सुमो/जीप	०३	१५,००,०००/-
२.	मोटार सायकल	०३	२,४०,०००/-
३.	अधिकारी यांचेकरीता टेबल	०१	३०,०००/-
४.	दुय्यम अधिकारी यांचेकरीता टेबल	०५	७५,०००/-
५.	इतर टेबल	२०	२,०००००/-
६.	रिव्हॉल्विंग चेअर	०५	५०,०००/-
७.	अभ्यागत खुर्ची	१०	१,००,०००/-
८.	कर्मचारी खुर्ची	४०	६०,०००/-
९.	गोदरेज कपाट	२०	२,०००००/-
१०.	संगणक/प्रिंटर/युपीएस	०६	३,३०,०००/-
११.	झेरॉक्स मशीन	०१	६०,०००/-
१२.	स्कॅनर	०३	१५,०००/-
१३.	ब्रेथ ॲनालायजर	०१	५०,०००/-
१४.	बॅरेकेटस	५०	१,५०,०००/-
१५.	सिलींग/स्टॅड फॅन	१५	३०,०००/-
१६.	दूरध्वनी संच	०३	३,०००/-
१७	वायरलेस सेट	०३	१,०२,०००/-
१८.	वॉकीटॉकी सेट	०५	१,६५,०००/-
१९.	२० मी. मास्ट	०१	१,६०,०००/-
२०.	१२ व्होल्ट बॅटरी	०१	६,०००/-
२१.	चार्जर	०१	४,५००/-
२२.	को-एक्सल केबल-१०० मी	१००	५,०००/-
२३	अँटेना- यागी व जीपी	०२	६,०००/-
एकुण रक्कम			**३५,४१,५००/-**